चिंतन



# कोरोनाच्या भीषण महामारीला 'सोमयाग' थोपवू शकतील

डॉ. बी.बी. पवार
(संस्थापक संपादक: 'पूर्वा कृषिदूत')

- आपल्या चतुर्वेदांसह विविध पुराणांमध्येही सोमयाग आणि सोमलतेचे संदर्भ आढळतात
- पंचमहाभूतांचा रोख बदलणारा सोमयाग कोरोना विषाणूला निष्प्रभ करू शकेल
- भारतात काही ठिकाणी झालेल्या सोमयागांमुळे परिसर जीवाणुमुक्त; पर्यावरण शुद्ध झाल्याची नोंद
- प्राचीन यज्ञसंस्कृतीचे काही मोजके अभ्यासक संस्थात्मक स्तरावर जपत आहेत ही परंपरा
- सरकारने सोमयाग विधीसाठी पुढाकार घेतल्यास दानशूर उद्योजकांचे लाभू शकेल अर्थसहाय्य

दर १०० वर्षांनी जगात महाभयंकर महामारी येत आहे. सन १७२० मध्ये जगात प्लेगची साथ आली. त्यात १ लाख लोक मृत्युमुखी पडले. सन १८२० मध्ये आशिया खंडामध्ये कॉलराची साथ आली. त्यातही लाखापेक्षा अधिक लोक दगावले. सन १९१८ ते १९२० मध्ये जगात स्पॅनिश फ्लूची साथ आली. त्या महामारीत ५ करोडपेक्षा अधिक लोकांचे जीव गेले. (यापूर्वीचा संदर्भ सापडत नाही.) आता २०२० मध्ये कोरोना ही महाभयंकर महामारी आली आहे. भारतासह अनेक राष्ट्रांमध्ये प्रचंड मनुष्यहानी चालू आहे. या प्रत्येक महामारीमध्ये मानवाने लस शोधली. पण तोपर्यंत खूप हानी झालेली आहे. आताही अनेक देशांमध्ये अनेक लसी शोधण्यात आल्या आहेत. त्यापैकी काही लसींचे मोठ्या प्रमाणावर लसीकरण सुरू आहे. तरीपण दररोज असंख्य लोकांना जीव गमवावा लागत आहे. दवाखान्यांमध्ये जागा (बेड), व्हेन्टिलेटर, ऑक्सिजन, रेमडेसिविर औषध मिळत नाही. तसेच स्मशानभूमीमध्येही अंत्यविधीसाठी जागा मिळत नाही. सर्वत्र लॉकडाऊनसारख्या परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. देशात सर्व जनतेचं लसीकरण करण्याची मागणी होत आहे. हे लसीकरण होईपर्यंत अगणित व्यक्तींना जीव गमवावा लागणार आहे. जनजीवन विस्कळीत झालं आहे. सर्वांनाच आर्थिक फटका बसत आहे. मनाला सुन्न करणारं हे संकट आहे.

## यज्ञसंस्कृतीचं महत्त्व

सध्या जागतिक हवामानबदल हीच समस्या सर्व जगाला भेडसावत आहे. त्यावर चर्चा करण्यासाठी सर्व देशांतील प्रतिनिधी दर दोन वर्षांनी अमेरिकेतील जनरल असेम्ब्लीमध्ये भेटतात. या 'ऑल वर्ल्ड रिलिजन ॲण्ड पीस' जागतिक परिषदेसाठी उडुपी मठाचे सुगुणेंद्रतीर्थ स्वामीजी यांची ५ वर्षांसाठी अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. एप्रिल २०१५ मध्ये अमेरिकेतील जनरल असेम्ब्लीमध्ये त्यांचं भाषण झालं. तेव्हा क्लायमेटिक डिसऑर्डरसाठी वेदातील यज्ञसंस्कृतीचं महत्त्व त्यांनी सर्वांपुढे मांडलं. सोमयागामुळे होणारे

पंचमहाभूतांवरचे परिणाम हेच हवामानातील बदलाला थोपवू शकणार आहेत, हे त्यांनी सर्वांना पटवून दिलं.

चारही वेदांमध्ये सोमयागाचं वर्णन आहे. त्याचप्रमाणे गरुडपुराण, विष्णुपुराण, गुरुचरित्र, सुश्रुत संहिता आणि अग्निपुराण या ग्रंथांमध्ये देखील सोमयाग व सोमलता याविषयी माहिती मिळते. जगातील इतर कुठल्याही धर्माच्या ग्रंथात सोमलतेची माहिती नाही. मध्ययुगापर्यंत भारतात सोमयाग सुरू होते. परकीय आक्रमणांमुळे व राजाश्रय नष्ट झाल्यामुळे सोमयाग बंद झाले.

सोमयागाचे नियम अतिशय कडक आहेत. विधिवत वेदाध्ययन झालेला वैदिक जो नित्य अग्निहोत्र सांभाळतो, तसेच रोज सप्त पाकयज्ञ व सप्त हविर्यज्ञ करतो अशी अहिताग्नि व्यक्तीच या यागाची यजमान होऊ शकते. आता देशात असे अतिशय पवित्र अहिताग्नि फक्त १०० च्या आसपास उरले आहेत. यज्ञात जो सोमरस प्यावा लागतो तो प्रचंड वीर्यशक्ती असलेला असतो. अशा प्रकारचे पवित्र शरीर नसेल तर एक थेंब सोमरसानेही ओठ फाटू शकतो अथवा पायातून रक्तस्राव होऊ शकतो. प्रचंड शक्ती असलेला हा सोमरस पचवायला तेवढीच शुचिर्भूतता आवश्यक असते.

## श्री योगिराज वेद विज्ञान आश्रम

दुष्काळाचं भीषण स्वरुप महाराष्ट्रातील जनतेने अनेकवेळा अनुभवलं आहे. यज्ञयाग हाच त्यावर उपाय आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शीजवळील कासारवाडी येथे श्री. नाना काळे यांनी 'श्री योगिराज वेद विज्ञान' या आश्रमाची स्थापना केली. श्री. नाना काळे हे प.पू. श्री. गुळवणी महाराजांचे शिष्य आहेत. यज्ञयागाचा त्यांचा दांडगा अभ्यास आहे. सन २०११-१२ साली त्यांनी १६ महिने चालणारा राजसूय यज्ञ केला. श्री. सुदर्शनजींचा तो संकल्प होता. पूर्वी पुराणकाळात राजा हरिश्चंद्र, युधिष्ठिर (धर्म) तसेच अत्रिपुत्र सोम यांनी हा यज्ञ केला होता. इतिहासात उत्तर प्रदेशातील कनोजचे राजे जयचंद्र गाहडवाल यांनी ११७० ते ११९० च्या दरम्यान राजसूय यज्ञ केला होता. त्यानंतर ८०० वर्षांनी श्री. नाना काळे यांनी हा यज्ञ केला. नीतिमान व लोककल्याणाची प्रबळ इच्छा असणारी क्षत्रिय कुळात जन्मलेली व्यक्तीच राजसूय यज्ञाचे यजमानपद भूषवू शकते. पांडव कुळातील श्री. ठाकूर मंगलसिंह व पृथ्वीराज चौहाणांच्या कुळातील सौ. रुक्मिणीदेवी या त्यांच्या पत्नी हे दाम्पत्य यजमान म्हणून लाभले. या यज्ञामुळे दैवी शक्तीने भारताला विविध क्षेत्रात चांगले पाठबळ मिळाले.

## ज्योतिर्लिंगे ही अग्नीची प्रकटस्थाने

इ.स. १९५० मध्ये तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याकडे एका व्यक्तीने एक शोधनिबंध दिला होता. त्यामध्ये १२ ज्योतिर्लिंगांचे महत्त्व दिले होते. त्याचा सारांश असा- 'मूलत: १२ ज्योतिर्लिंगे ही वैश्विक अग्नीची प्रकटस्थाने आहेत. ही १२ ज्योतिर्लिंगे पर्जन्यचक्राला गती देऊन भारतात आकर्षित करतात. जर वर्षाचक्र सुरू होण्यापूर्वी १२ ज्योतिर्लिंगांतील स्थानांवर महासोमयाग केले तर संपूर्ण भारतात वेळेवर व विपुल पर्जन्यवृष्टी होईल.' सन २००५ मध्ये बंगलोर (बंगळुरू) येथे 'वर्ल्ड वैदिक कॉन्फरन्स' झाली होती. त्यात श्री. सुदर्शनजी, डॉ. विजय भटकर, वे.मू. लिमये व श्री. काळे चर्चेत सहभागी झाले होते. श्री. सुदर्शनजींच्या प्रेरणेने सन २००६ मध्ये संपूर्ण भारतात वेळेवर व विपुल प्रमाणात पाऊस व्हावा म्हणून देशातील १६ ठिकाणी सोमयाग केले गेले. त्यामध्ये १२ ज्योतिर्लिंगांसह कासारवाडी, त्रिवेंद्रम (तिरुवअनंतपूरम), द्वारका व राजकोट या ठिकाणांचा समावेश होता. या सोमयागांची जबाबदारी श्री योगिराज आश्रमाने उचलली होती. कन्याकुमारी ते हिमालय (केदारनाथ) या अतिशय विस्तृत क्षेत्रात हे याग करणं, त्यासाठी ६-७ महिन्यांचा कालावधी देणं, मोठ्या संख्येने वैदिक व कार्यकर्त्यांची सोय करणं

हे अतिशय अवघड काम होतं. महत्त्वाची बाब म्हणजे अर्थसहाय्य. ती जबाबदारी श्री. मोहनलाल मित्तल, श्री. खेमका, श्री. यदुजी दालमिया अशा दातृत्ववृत्तीच्या महाभागांनी सांभाळली. या प्रकल्पापासून प्रेरणा घेत त्यावेळचे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मा.श्री. शिवराजसिंह चौहान यांनीही मध्य प्रदेशातील अवर्षण दूर करण्यासाठी संकल्प केला. त्यानुसार सन २००८ मध्ये १०, सन २००९ मध्ये ११ व सन २०१० मध्ये १० असे एकूण ३१ सोमयाग विविध ठिकाणी केले. या सर्व यागांच्या परिणामांची शास्त्रशुद्ध नोंद तज्ज्ञांतर्फे ठेवण्यात आली. त्यानंतर या 'सौमिक सुवृष्टी प्रोजेक्ट' अंतर्गत सन २०११ मध्ये एकूण २० सोमयाग करण्याचा संकल्प आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. विजय भटकर यांनी सोडला होता.

## 'पवित्र सोम राष्ट्रीय वेद विज्ञान अनुसंधान पीठ' स्थापन

सांगली येथील श्री. सुनील सांबारे यांनी 'सॅक्रेड सोमा वैदिक सायन्स रिसर्च फाऊंडेशन (पवित्र सोम राष्ट्रीय वेद विज्ञान अनुसंधान पीठ) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेशी जवळपास ६० प्रथितयश वैज्ञानिक, प्राध्यापक, डॉक्टर, अभियंते, कृषितज्ज्ञ व वैद्य संलग्न आहेत. सांगलीच्या पटवर्धन संस्थानचे सात पिढ्यांपासून राजवैद्य असलेल्या घराण्यात श्री. सुनील सांबारे यांचा जन्म झाला. तरीही त्यांनी कला शाखेतील बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर १६ वर्षे कार्पोरेट क्षेत्रात काम केले. एका कंपनीत ते रिजनल मॅनेजर होते. त्यांच्या प्रकृतीच्या अडचणीसाठी त्यांचे गुरु डॉ. वादिराजाचार्य वरखेडकर गुरुजी यांनी त्यांना गीतेची पारायणं करायला सांगितली. त्यांनी अनेक पारायणं केली. त्यानंतर त्यांना गुरुकडून पातंजल योगदर्शनाचा लाभ झाला. पूर्ण अभ्यास झाल्यावर त्यांनी लोकांना मागदर्शनही केले.

## डॉ. उमानाथ माहेश्वर बहादूर गुरुजींची भेट

सन २००२ मध्ये श्री. सांबारे यांचा सोमवल्लीशी संबंध आला. त्यांची भेट अवधूत अवलिया डॉ. उमानाथ माहेश्वर बहादूर गुरुजी यांच्याशी झाली. गुजरात आयुर्वेद युनिव्हर्सिटी या भारतातील पहिल्या आयुर्वेदिक विद्यापीठाचे ते कुलगुरू होते. त्यांचा जन्म मुसलमान घरात झाला तर त्यांची पत्नी ब्रिटिश वंशाची होती. तरीही त्यांना वेद व पुराणं कंठस्थ होती. सोमवल्लीवर त्यांनी ७ वर्षे काम केलं. त्यासाठी ते अफगाणिस्तानातही गेले. ते जेव्हा स्वत: सांबारे यांना भेटायला गेले तेव्हा त्यांनी सोमवल्लीवर केलेल्या संशोधनाचे काम सांबारेंच्या स्वाधीन केलं आणि ते म्हणाले, "हे कार्य आता तुला पुढे घेऊन जायचं आहे." त्यानंतर काही वर्षांतच त्यांचं निधन झालं. श्री. सांबारे यांनी सोमा फाऊंडेशनच्या माध्यमातून सोमलतेचे काही प्रकार अफगाणिस्तान, हिमालय, गुजरात व आंध्र प्रदेश येथून जमा केले. या वेलीचे एकूण २४ प्रकार आहेत. त्यापैकी त्यांनी ६ प्रकारांची लागवड वैदिक पद्धतीने जामनगर व सिद्धपूर येथे केली आहे.

## पाच किलोमीटरचा परिसर झाला जीवाणूमुक्त

सोमयागाचे परिणाम आश्चर्यकारक आहेत. श्री. सांबारे यांच्या संस्थेतर्फे सोमयागांच्या परिणामांचे वैज्ञानिक परीक्षण केले गेले. त्यांनी सोमयागाचा पंचमहाभूतांवर होणारा परिणाम अभ्यासला. म्हणजेच भूमी, पाणी, वायू व एकंदर वातावरणावर होणारा परिणाम तपासला. त्याचप्रमाणे आरोग्यावर होणारे परिणामही अभ्यासले. सोमरसाच्या हवनाने आजूबाजूच्या ५ कि.मी. पर्यंतच्या परिसरात मूलद्रव्यांची शुद्धी होते. जिथे जिथे हा धूर जातो तिथे वायुशुद्धी होते. भूजल स्तर वाढतो. पर्जन्य व्यवस्थित होतो. सर्व प्राणिमात्रांची धारणाशक्ती व रोगप्रतिकारक शक्ती वाढते. हवेतील जीवाणूंच्या कॉलनी काऊंटसाठी ५ कि.मी. परिसरात पेट्रीडिशेस ठेवण्यात आल्या होत्या. सोमयाग झाल्यावर त्या डिशेसची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की सर्व परिसर पूर्ण जीवाणूमुक्त झाला होता.

## कर्नूल येथील यागाचे विस्मयकारक परिणाम

श्री. सांबारे यांच्या संस्थेतर्फे कर्नूल येथे १२ दिवसांचा सोमयाग करण्यात आला होता. या यागात आहुती दिल्यानंतर ॲनालायझरवर विस्मयकारक परिणाम आढळले. नत्राची पातळी जवळ जवळ शून्यावर होती. कर्ब पातळी एकदम कमी आणि प्राणवायूची पातळी २४% पासून वाढत ९४% पर्यंत वाढली. हा परिणाम त्यांना १५० कि.मी. पर्यंत आढळला. सोमयागांच्या परिणामांचे मूल्यांकन करून ते 'यज्ञस्थंडिल' नावाने पुस्तकाच्या रुपात प्रकाशित करण्यात आले. अतिरात्र महासोमयागाचे संशोधन इंटरनेटवरही पाहता येईल. माईंड मॅपिंग मशिनद्वारे विचारांची आंदोलने तपासण्यात आली. त्यात येणारे विचार बहुतकरून 'राईट थॉट्स' होते.

## भद्राचलम येथील अतिरात्र सोमयागाचे परिणाम

तेलंगणातील भद्राचलम येथे 'अतिरात्र सोमयाग' करण्यात आला. हे ठिकाण गोदावरी नदीच्या किनारी वसलेलं आहे. या ठिकाणचं एक वैशिष्ट्य असं आहे की, तेथे वर्षातून एकदाच पाऊस पडतो आणि तो देखील रामनवमीला. तेथे रामनवमीला रामाचं लग्न लावतात. आपण जन्मोत्सव साजरा करतो. लग्न लावल्यानंतर तेथे एकदाच पाऊस पडतो. या संस्थेने तेथे उन्हाळ्यात सोमयाग केला. त्यावेळी कमाल तापमान ४८ अंश से. होते. सोमयागात शेवटची आहुती दिल्यानंतर तिथे कुंभवृष्टी झाली. दुपारी साडेतीनला सुरू झालेला पाऊस रात्री साडेआठपर्यंत कोसळत होता. तेव्हा यज्ञशाळेचे पत्रेही उडून गेले. त्याप्रसंगी ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ शुक्ल, डॉ. वादिराजाचार्य वरखेडकर गुरुजी व प्रोफेसर राव उपस्थित होते.

या यागाच्या आयोजनात संस्थेच्या सदस्यांपैकी २० सदस्यांनी भाग घेतला होता. स्थानिक लोकांचीही मदत घेण्यात आली. विज्ञान शाखेतील विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यासाठी आधी काही सेमिनार घेतले होते. सोमयाग व त्याचे परिणाम याबद्दल त्यांना माहिती देण्यात आली होती. त्यापैकी २० सदस्यांनी भाग घेतला होता. त्यांच्या मदतीने वैज्ञानिक दृष्टिकोनातून रिपोर्ट लिहिले व एक डॉक्युमेंटरी फिल्म तयार केली. 'वेद विज्ञान मे राष्ट्र दर्शन' या नावाने ती प्रकाशित केली. या यागाचेही परिणाम आश्चर्यकारक आहेत. पंचवीस ते तीस कि.मी.च्या परिसरात जिथे पेरणी झाली होती त्या रोपांची झपाट्याने वाढ झाली. एक ते दीड लिटर दूध देणाऱ्या गायी एकदम ३-४ लिटर दूध देऊ लागल्या. वृक्षांच्या पानांमध्ये क्लोरोफिलचे प्रमाण खूप वाढले. अशाच प्रकारची निरीक्षणं बीड, रत्नागिरी, हैदराबाद व कर्नूलमध्येही नोंदली गेली.

देशात वेळेवर व विपुल पाऊस पडण्यासाठी वर उल्लेख केल्याप्रमाणे १२ ज्योतिर्लिंगे, पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक अशा काही ठिकाणी सोमयाग करण्याची गरज आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी ही अतिशय योग्य वेळ आहे. देशातील सोमयागाची माहिती असलेल्या सर्व संस्थांची मदत घेऊन सोमयागांचे नियोजन केले पाहिजे. कोरोनाचा विषाणू सोमयागामुळे आटोक्यात येतो का याची शहानिशाही केली पाहिजे. तसे होत असल्यास देशात सर्वत्र सोमयागाचं आयोजन करता येईल. सध्या दवाखाने उभारणी, बेड, व्हेन्टिलेटर, ऑक्सिजन, रेमडेसिविर औषध यांच्यासाठी अमाप खर्च होत आहे. हा खर्च सोमयागांकडे वळवता येईल. जगातील श्रीमंत लोकांपैकी अंबानी, अदानींसारखे पाच लोक मुंबईत आहेत. त्यांच्याकडून आर्थिक मदत घेता येईल. कोरोनाचा बंदोबस्त होत असेल तर अनेक दातृत्व वृत्तीचे लोक पुढे येतील. देशात सोमयागांच्या आयोजनासाठी कुठलीही अडचण येणार नाही. अशा महाभयंकर आपत्तीच्या प्रसंगी सोमयागाशी संबंधित महाभाग पुढे का येत नाहीत? त्यांनी मुंबई, पुणे, नागपूर अशा एका ठिकाणी सोमयागाचा प्रयोग केला पाहिजे. सोमयागाचे परिणाम अतिशय सकारात्मक आहेत. त्यामुळे सरकारने व या संस्थांनी यात पुढाकार घ्यावा असे वाटते. ■